झोत

# कुवेती स्त्रीचा पथदर्शी प्रवास



**उमा श्रीराम**

मुंबई
भ्र. ९८१९ ३८७ ८८६
इमेल - umasri@gmail.com

२००९ मधल्या ख्रिसमसची सुट्टी मी कुवेतमध्ये घालवली. त्या काळात कुवेतमधील प्रसिद्ध ठिकाणं, प्रचंड मोठे मॉल्स आणि शॉपिंग कॉम्प्लेक्सेस मी पाहिले. पण या सर्व ठिकाणी मला कुवेती स्त्रियांचे जे रूप पाहायला मिळाले त्याने मी काहीशी चकित झाले. त्यांची वेशभूषेबद्दलची नेमकी जाण, स्टायलिश जीवनसरणी आणि इस्लामी संस्कृतीचा अमिट ठसा; आधुनिकता आणि परंपरा यांचे आदर्शवत संतुलनच!

मध्यपूर्वेत न जाणाऱ्या भारतीयांच्या दृष्टीने अरब देश म्हणजे पुरुषसत्ताक समाजात दडपलेल्या स्त्रियांचे आगर जणू. घराबाहेर न पडणाऱ्या, पडल्याच तर बुरखा ओढलेल्या, धर्माच्या तुरुंगात वावरणाऱ्या अशी येथील स्त्रियांची प्रतिमा आढळते. पण ही गोष्ट फारशी खरी नाही. कुवेतमध्ये एक बिनआवाजी स्त्रीमुक्ती येऊ घातलेली दिसते. कमावते पुरुष आणि घर संभाळणाऱ्या स्त्रिया ही परिस्थिती कुवेतमध्ये आता राहिलेली दिसत नाही. परिस्थिती धीम्या गतीने का होईना पण सातत्याने बदलते आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये स्त्रिया उतरत आहेत.

अर्थात, कुवेतला सोळाशे वर्षांचा समृद्ध इतिहास आहे. या प्रदीर्घ काळात समाजामध्ये अनेक बदल झालेले असले तरी गेल्या शतकात ब्रिटिशांनी कुवेतचा ताबा घेतला आणि देशाच्या समृद्धतेची लूट सुरू केली. १९६१ मध्ये १९ जून रोजी अब्दुल्लाह अल सलीम अल सबाहच्या नेतृत्वाखाली कुवेत पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त झाला. ब्रिटिश राजवटीत चालत असलेला भारतीय रिझर्व बँकेच्या गल्फ रुपयाची जागा कुवेती दिनारने घेतली. बर्गन प्रभागातील तेलखाणींच्या शोधाबरोबर प्रचंड प्रमाणात परकीय गुंतवणूक कुवेतमध्ये आली. तेल आणि पेट्रोलियम पदार्थांच्या उद्योगातील मोठ्या वाढीने कुवेत हा जगातील एक श्रीमंत देश झाला. अर्थात, इतर सर्व देशांप्रमाणे या श्रीमंतपणाची, स्वतंत्रपणाची फळे स्त्रियांच्या वाट्याला काहीशा उशीरा आली. राज्यघटनेने जरी स्त्रियांना समान अधिकार दिलेले असले तरी ते वास्तवात येण्यासाठी मोठा काळ

गेला. साठीच्या दशकाच्या सुरुवातीला अनेक स्त्री - कार्यकर्त्यांनी समतावादी चळवळीला सुरुवात केली, पण गेल्या दोनेक दशकातच त्यांच्या कामाचा दृश्य परिणाम दिसू लागला असे म्हणता येईल.

१९९० मधील इराकच्या कुवेतवरील आक्रमणाने खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या राजकीय व सामाजिक हक्कांच्या चळवळीला बळ मिळाले. कुवेतने इराकला दिलेले ६५ अब्ज डॉलर्सचे कर्ज माफ करावे अशी सद्दाम हुसेन यांची विनंती धुडकावताच इराकने कुवेतच्या सीमा ओलांडून देश जबरदस्तीने आपल्या ताब्यात घेतला. अमेरिकेच्या नेतृत्वाखाली ३४ देशांनी कुवेतवरील हे आक्रमण परतवून लावले. या दुसऱ्या मुक्तियुद्धामध्ये कुवेती स्त्रियांनी मोठ्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. अनेकजणी शहीद झाल्या. श्रीमती असरार अल काबंदी यांनी कुवेती विद्रोहाचे नेतृत्व केले आणि या लढ्यामध्ये धारातीर्थी पडल्या. आरोग्यसेवेमध्ये स्त्रियांचा मोठा सहभाग होताच पण त्याचबरोबर इराकी सैन्याची नजर चुकवून अन्न, पैसे आणि शस्त्रास्त्रांची नेआण करण्यात स्त्रियांनी मोठी भूमिका बजावली.

कुवेत मुक्त झाल्यानंतर त्यांच्या या प्रखर संघर्षाचे फळ त्यांच्या पदरात पडले नसते तरच नवल. कुवेतच्या आमिराने १९९९ मध्ये स्त्रियांना मताधिकार दिला आणि त्यांना संसदेत प्रतिनिधित्व करता येईल अशी तरतूद संसदेसमोर मांडली. पण संसदेने ती धुडकावून लावली. कुवेती स्त्रियांनी आता माघार न घेण्याचे ठरवले होते. जगाच्या पाठीवर कुठेही पुरुष स्वत:होऊन स्त्रियांना अधिकार देतील हे होत नाही, कुवेतमध्ये तरी ते कसे होणार? स्त्रियांनी सामाजिक व राजकीय हक्कांसाठीचा आपला संघर्ष चालूच ठेवला. अखेरीस मे २००५ मध्ये कुवेतमधील स्त्रियांच्या राजकारणातील प्रवेशावरची बंदी उठली. जून १९९९ मध्ये एक स्त्री केंद्रीय मंत्रिमंडळात होती. एप्रिल २००५ मध्ये स्त्रियांनी पहिल्यांदा कुवेती संसदेसाठीच्या मतदानामध्ये सहभाग घेतला.

यानंतरही कायदा आणि धार्मिक रीतीरिवाजांच्या संदर्भात देखील स्त्रियांचा झगडा सुरू राहिला. विद्यापीठांमधून शिक्षण घेणाऱ्यांमध्ये ७० टक्के विद्यार्थिनी आहेत तर कुवेतमधील रोजगार करणाऱ्यांपैकी ४० टक्के स्त्रिया आहेत. शिक्षण, वैद्यक, व्यवसाय, पत्रकारिता, बँकिंग आणि प्रशासन अशा सर्व क्षेत्रांमध्ये आज संख्येने स्त्रिया दिसतात. अनेक महिला उद्योजक स्वत:च्या मोठमोठ्या यंत्रणा समर्थपणे चालवत आहेत. खाजगी क्षेत्रामध्ये देखील कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीइओ) म्हणून अनेक स्त्रिया कार्यरत असून त्या अब्जावधी डॉलर्सचा व्यवहार करतात. तसेच परराष्ट्र दूतावासात देखील अनेक महिला कार्यरत आहेत. साहजिकच कुवेती समाजाचा स्त्रीविषयक दृष्टिकोन झपाट्याने बदलताना दिसतो आहे.

व्यवसायाच्या / रोजगाराच्या ठिकाणी स्त्रियांना टिकण्यासाठी, पदोन्नती करण्यासाठी कौटुंबिक पाठिंब्याची गरज असते. इथे काम करणाऱ्या बहुसंख्य स्त्रिया या मध्यम वा उच्चमध्यम वर्गातील आहेत. कामाच्या ठिकाणी अनुभवास येणाऱ्या लैंगिक अत्याचारापासून त्या बऱ्यापैकी मुक्त आहेत, याचे कारण त्यासंबंधीच्या कायद्यांची कठोर अंमलबजावणी होते.

कुवेती स्त्रीला पासपोर्ट मिळवण्यासाठी तिच्या पतीची संमती लागत नाही, असा आणखी एक महत्त्वाचा बदल झालेला आहे. न्यायालयाच्या एका निर्णयामुळे हा हक्क प्राप्त झाला. त्यापूर्वी स्त्रीच्या पासपोर्टच्या अर्जावर नवऱ्याची सही असणे आवश्यक होते. कुवेतमधील स्त्रीमुक्ती लढ्याचे एक यशस्वी पाऊल असे या निर्णयाकडे पाहता येते. शेजारी राष्ट्र असलेल्या सौदी अरेबियाच्या तुलनेत कुवेती स्त्री आज खूपच पुढे आहे हे निश्चित. सौदी अरेबियात स्त्रियांना मोटार चालवण्यास बंदी आहे. उलटपक्षी कुवेतमध्ये सध्या 'गुलाबी टॅक्सी'ची हवा आहे. गुलाबी टॅक्सी म्हणजे केवळ स्त्रियांसाठी स्त्री ड्रायव्हर्स चालवत असलेल्या टॅक्सी. आणि या टॅक्सींचा व्यवसाय करण्याची परवानगी देखील केवळ स्त्रि-व्यावसायिकांनाच असणार आहे! संसद सदस्य, मंत्री, राजदूत, पोलीस आणि आता टॅक्सी ड्रायव्हर्स! फॅशन जगतामध्ये देखील कुवेती स्त्रिया मागे नाहीत. साहजिकच बहुसंख्य स्त्रियांसाठी 'बुरखा' हा मुद्दाच गैरलागू आहे. बुरख्यामुळे स्त्रियांची प्रगती थांबतही नाही वा त्यांना विशेष सवलतही मिळत नाही.

जगातील १०० समर्थ स्त्रियांच्या 'फोर्ब्ज'ने प्रसिद्ध केलेल्या यादीत कुवेतच्या श्रीमती महा अल घुनायम यांचा समावेश आहे. त्या ग्लोबल इन्व्हेस्टमेंट हाऊसच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आहेत. प्रसारमाध्यमांमध्ये देखील श्रीमती बीबी अल मरज़ौक या प्रमुख संपादक आहेत.

अनेक स्त्रिया शैक्षणिक, व्यावसायिक आणि समाज हितकारी संस्था चालवत आहेत. या संस्थांचा कुवेती समाजमानसावर थेट परिणाम होतो आहे, जेणेकरून स्त्रीमुक्तीचा मार्ग अधिकाधिक प्रशस्त होतो आहे. रस्ता अजून बराच दूरचा आहे, पण ज्या ताकदीनं आणि मजबूत इराद्यानं त्या प्रवास करत आहेत, केवळ अरब देशातील स्त्रियांसाठीच नव्हे, तर जगभरच्या स्त्रियांसाठी त्यांचे कार्य पथदर्शी ठरेल हे नक्कीच.